जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 APR 2024
पुढारी



कोल्हापूर : स्टोरीमॅप स्पर्धेचे विजेतेपद मिळविणाऱ्या डॉ. अभिजित पाटील यांचे ग्रंथ भेट देऊन अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. सचिन पन्हाळकर.

# शिवाजी विद्यापीठाचे डॉ. अभिजित पाटील एस्री-इंडियाच्या 'स्टोरीमॅप' स्पर्धेत विजेते

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय स्तरावरील स्टोरीमॅप स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागातील अध्यापक डॉ. अभिजित पाटील यांनी विजेतेपद मिळवले. 'हिडन जेम्स ऑफ बांदिवडे : द जिऑलॉजिकल ट्रेजर' विषयावर प्रकल्प त्यांनी सादर केला होता.

जीआईएस (भौगोलिक माहिती प्रणाली) क्षेत्रातील जगातील सर्वात मोठी संस्था असलेल्या एस्री- इंडिया संस्थेमार्फत तीन वर्षांपासून राष्ट्रीय स्तरावर स्टोरीमॅप स्पर्धा घेण्यात येते. स्पर्धेसाठी गतवर्षी डॉ. पाटील यांनी 'हिडन जेम्स ऑफ बांदिवडे : द जिऑलॉजिकल ट्रेजर' विषयावरील प्रकल्पाचे सादरीकरण केले. सादरीकरणाने प्रेक्षकांना भुरळ घातली नाही, तर बांदिवडेच्या निर्मनुष्य, निसर्गरम्य भूगर्भीय चमत्कारांच्या अंतर्दृष्टीपूर्ण शोधासाठी व्यापक प्रशंसा मिळवली. स्पर्धेमध्ये त्यांना सर्वोत्कृष्ट ठरविण्यात आले. यशाबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी डॉ. अभिजित पाटील यांना ग्रंथ भेट देऊन अभिनंदन केले. यावेळी डॉ. सचिन पन्हाळकर उपस्थित होते.

25 APR 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदे यांचे दुर्लक्षित वाङ्मय प्रकाशित

■ ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेखन वैचारिक, सामाजिक आशयाबरोबर वाङ्मयीन गुणवत्तादृष्ट्या श्रेष्ठ स्वरूपाचे होते. महर्षी शिंदे यांच्या संवेदनशील आणि संपन्न व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार त्यांच्या ललित लेखत आहे. त्यांचे वाङ्मय हे करुणेने भरलेले आहे. 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन' या ग्रंथामुळे त्यांचे दुर्लक्षित वाङ्मय प्रकाशित झाले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ट विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी केले.



कोल्हापूर : डॉ. विजया पाटील-वाडकर लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन' ग्रंथाचे प्रकाशन करताना ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ. सोबत डॉ. रणधीर शिंदे, डॉ. विजया पाटील-वाडकर, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. नंदकुमार मोरे.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त प्रा. एन. डी. पाटील प्रतिष्ठान यांच्या वतीनें प्रकाशित डॉ. विजया पाटील-वाडकर लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन' या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

बेडकीहाळ म्हणाले, शिंदे यांची सूक्ष्म अवलोकन दृष्टी, अनुभवविश्व व त्यांच्या अंतर्दृष्टीचा आवाका त्यांच्या वाङ्मयातून व्यक्त झाला आहे. महर्षी शिंदे समाजसुधारक, अस्पृश्यता निवारणाचे खंदे पुरस्कर्ते होते.त्यांच्या वाङ्मयावर लेखिका डॉ. विजया पाटील-वाडकर यांनी प्रकाश टाकला आहे. प्राचार्य टी. एस. पाटील यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या बहुजनवादी राजकारण व सामाजिकतेचे वेगळेपण नमूद केले. अध्यक्षस्थानावरून बोलताना वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, महर्षी शिंदे यांच्या विचारविश्व आणि लेखनशैलीने महाराष्ट्राचे मन आणि हृदय घडविले आहे.

डॉ. विजया पाटील-वाडीकर व राहुल पवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी करून दिला. आभार राजेश पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. यावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस, सुरेश शिपुरकर, डॉ. माया पंडित, शरद नावरे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, अशोक वाडकर, अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 APR 2024
पुढारी

# डॉ. प्रतापसिंह जाधव यांचा प्राचार्य कणबरकर पुरस्काराने आज सन्मान

## पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते होणार प्रदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांचा गुरुवारी (दि. २५) सन्मान होणार आहे. राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मुंबईचे अध्यक्ष, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात दुपारी चार वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती, तसेच संस्थांना हा पुरस्कार दिला जातो. यंदाचे हे पुरस्कारचे ९ वे वर्ष आहे.

पत्रकारिता, सामाजिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत डॉ. जाधव यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 APR 2024
लोकमत

# महर्षींचे वाङ्मय करुणामय

## बेडकिहाळ : 'वि. रा. शिंदे' ग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेखन वैचारिक, सामाजिक आशयाबरोबर वाङ्मय गुणवत्तादृष्ट्या श्रेष्ठ स्वरूपाचे होते. महर्षी शिंदे यांच्या संवेदनशील आणि संपन्न व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार त्यांच्या ललितलेखनात आहे. त्यांचे वाङ्मय हे करुणेने भरलेले आहे, असे मत ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी मंगळवारी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन व एन. डी. पाटील प्रतिष्ठान यांच्या वतीने प्रकाशित डॉ. विजया पाटील-वाडकर लिखित महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन ग्रंथाच्या प्रकाशन समारंभप्रसंगी ते बोलत होते.

बेडकिहाळ म्हणाले, शिंदे यांची सूक्ष्म अवलोकन दृष्टी, संपन्न अनुभवविश्व व त्यांच्या अंतर्दृष्टीचा आवाका त्यांच्या वाङ्मयातून व्यक्त झाला आहे.

प्राचार्य टी. एस. पाटील यांनी वि. रा. शिंदे यांच्या बहुजनवादी राजकारण व सामाजिकतेचे वेगळेपण नमूद केले. डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, महर्षींच्या विचारविश्व व लेखनशैलीने राज्याचे मन आणि हृदय घडविले आहे. या ग्रंथातून शिंदे यांच्या वाङ्मय कंगोऱ्यांचा उत्तमरीत्या परिचय करून दिला आहे.

डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय केला. डॉ. विजया पाटील व राहुल पवार यांनी मनोगत व्यक्त केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन, तर राजेश पाटील यांनी आभार मानले. डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. राजन गवस, राहुल पवार, सुरेश शिपूरकर, डॉ. माया पंडित, शरद नावरे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, आदी उपस्थित होते.

25 APR 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्रचे ३२ विद्यार्थी शासकीय नोकरीत

## प्रशासनाकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन : संशोधन अधिकारीपदी सरिता वारके, नीलमा पाटील

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील ३२ विद्यार्थ्यांनी गेल्या वर्षभरामध्ये विविध सांख्यिकी पदावर यश संपादन केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचानालयाद्वारे संशोधन अधिकारी पदासाठी सरिता वारके व नीलम पाटील यांची निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विभागप्रमुख डॉ. एस. बी. महाडिक यांनी अभिनंदन केले आहे.

पृथ्वीराज झांबरे व निकेत जाधव यांची इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च मार्फत राष्ट्रीय पोषण संस्था- हैदराबाद व राष्ट्रीय विषाणु विज्ञान संस्थान, पुणे येथे तांत्रिकी सहाय्यक म्हणून निवड झाली आहे. मुकुंद बाचनकर, सुवर्णा मळावे, सोनम लंगुटे, आदिनाथ पाटील व विशाखा पाटील यांची प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन दलाचे प्रमुख) कार्यालयात वरिष्ठ व कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक म्हणून रुजू झाले आहेत. विशाल झिटे, प्रतीक दामते, ओंकार पाटील, प्राजक्ता जाधव, माधुरी नाझरे, शुभांगी स्वामी, मेघना साळवे, दिपाली करणे, वैभव सुराशे, विक्रांत रास्ते, उत्कर्ष शेलार, सोनम साठे, सृष्टी मोरे, निकेत जाधव, स्वप्नाली पवार, शुभांगी शेंडगे, किरण चोथे, या विद्यार्थ्यांची महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये सांख्यिकी अन्वेषक म्हणून निवड झाली आहे. त्याचबरोबर दादासाहेब गोडसे, शिल्पा पाटील, शाईन मुजावर, सुनील मोरे, ओंकार पाटील, शुभांगी पाटील, कृष्ण माळी, श्रुती ओतारी आणि अशोक भोसले या विद्यार्थ्यांची विविध महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून निवड झाली आहे. विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश विद्यापीठाचा नावलौकिक वाढविणारे आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये बहुतांश विद्यार्थी ग्रामीण भागातून व हालाखीच्या परिस्थितीतून आलेले आहेत. संख्याशास्त्र विभागाद्वारे विद्यार्थ्यांना युपीएससी व एमपीएससी, भारतीय रिजर्व बँक, भारतीय रेल्वे, अर्थ व सांख्यिकी संचनालय, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ इत्यादीद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन केले जाते. यापूर्वीही संख्याशास्त्र अधिविभागाच्या विध्यार्थ्यांनी युपीएससी मार्फत भारतीय सांख्यिकी सेवेत, तसेच भारतीय रिजर्व बँक, भारतीय रेल्वे, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत अर्थ व सांख्यिकी संचनालयाद्वारे मंत्रालय तसेच प्रत्येक जिल्ह्याच्या नियोजन विभागामध्ये जिल्हा नियोजन



अधिकारी, जिल्हा सांख्यिकी अधिकारी, संशोधन अधिकारी, तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळामध्ये सांख्यिकी अधिकारी म्हणून १०० हून अधिक विध्यार्थी कार्यरत आहे. हि बाब शिवाजी विद्यापीठासाठी गौरवास्पद आहे. संख्याशास्त्र विषयाची उपयोगीतता लक्षात घेता भविष्यात अजून संधी निर्माण होणार आहेत. त्यामुळे हा आलेख दिवसेंदिवस वाढतच जाईल यात काही शंका नाही.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 APR 2024
लोकमत

# 'संख्याशास्त्र'चे ३२ विद्यार्थी शासकीय सेवेत

## वर्षभरातील स्थिती : विद्यापीठाचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : स्पर्धा परीक्षांमध्ये दिवसेंदिवस चुरस वाढत असताना शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील ३२ विद्यार्थ्यांनी गेल्या वर्षभरामध्ये विविध शासनाच्या सांख्यिकी पदावर यश संपादन केले.

महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचानालयाद्वारे संशोधन अधिकारी पदासाठी आयोजित परीक्षेमध्ये सरिता बाळासो वारके व नीलम तानाजी पाटील यांची निवड झाली. पृथ्वीराज विठ्ठल झांबरे व निकेत गणेश जाधव यांची तांत्रिकी सहायकपदी निवड झाली. मुकुंद शशिकांत बाचनकर, सुवर्णा दगडू मळावे, सोनम महादेव लंगुटे, आदिनाथ तुकाराम पाटील व विंशाखा विलास पाटील हे प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय येथे वरिष्ठ व कनिष्ठ सांख्यिकी सहायक म्हणून रुजू झाले. पृथ्वीराज विठ्ठल झांबरे, विशाल बापू झिटे, प्रतीक सदाशिव दामते, ओंकार प्रभाकर पाटील, प्राजक्ता महादेव जाधव, माधुरी विनायक नाझरे, शुभांगी महादेव स्वामी, मेघना नारायण साळवे, आदिनाथ तुकाराम पाटील, दीपाली दशरथ करणे, वैभव रामदास सुराशे, विक्रांत माणिक रास्ते, उत्कर्ष उत्तम शेलार, सोनम तात्यासाहेब साठे, सृष्टी शिवाजी मोरे, निकेत गणेश जाधव, स्वप्नाली प्रदीप पवार, शुभांगी मारुती शेंडगे, सोनम महादेव लंगुटे, सुवर्णा दगडू माळवे, किरण मल्हारी चोथे, आणि विशाखा विलास पाटील अशा २२ विद्यार्थ्यांची सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये सांख्यिकी अन्वेषक म्हणून निवड झाली.

दादासाहेब गोडसे, शिल्पा पाटील, शाईन मुजावर, सुनील मोरे, ओंकार पाटील, शुभांगी पाटील, कृष्ण माळी, श्रुती ओतारी आणि अशोक भोसले या विद्यार्थ्यांची विविध महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक म्हणून निवड झाली. विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश विद्यापीठाचा नावलौकिक वाढविणारे आहे.

25 APR 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'संशोधकांनी विज्ञानाचा इतिहास समजून घ्यावा : डॉ. पाटील

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २४ : 'नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने एमएसएफडीए व आयुका या संस्था महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. खगोलशास्त्र भविष्यकाळात अधिक महत्त्वाचे ठरणार असून प्राचीन भारतामधील संशोधकांनी साधने उपलब्ध नसताना अवकाशातील विविध तारे व ग्रहांविषयी अनेक अंदाज अचूकपणे बांधलेले आहेत. या अभ्यासाच्या जोरावरच भविष्यामधील संशोधनामध्ये कल्पकतेचा वापर करून अनेक गोष्टी निर्माण करता येतील. विज्ञानाचा इतिहास समजून घ्यावा," असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

ते महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट ॲकेडमी व आयुका यांच्या वतीने न्यू कॉलेज येथे आयोजित ॲस्ट्रॉनॉमी, सायन्स आणि सोसायटी या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे संचालक पी. के. पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात समाजामध्ये खगोलशास्त्राच्या अनुषंगाने असलेले गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. समाजामध्ये ग्रहताऱ्यांविषयी असलेले समज चुकीचे असल्याचे सांगितले. उपप्राचार्य डॉ. आर. डी. दमकले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. या वेळी डॉ. कल्याणी गोखले, डॉ. अपूर्वा बर्वे, डॉ. पुष्पा खरे व डॉ. द्रुबासेकीया, संचालक प्रा. विनय पाटील, आर. डी. पाटील, प्रा. अनिता पवार उपस्थित होते. डॉ. पी. डी. कांबळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 APR 2024
सकाळ

# विविध अभ्यासक्रमांसाठी १६ मे पासून प्रवेश परीक्षा

## अर्ज करण्याची मुदत वाढणार

कोल्हापूर, ता. २४ : एम. एस्सी., एम. कॉम., एम. ए., आदी विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया शिवाजी विद्यापीठाने सुरू केली आहे. या अभ्यासक्रमांसाठी १६ ते १९ मे दरम्यान प्रवेश परीक्षा ऑफलाईन स्वरुपात घेतली जाणार आहे. त्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. त्यासाठी आतापर्यंत तीन हजार ५७० अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज करण्याची मुदत किमान दहा दिवसांनी वाढविण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये कला, वाणिज्य, विज्ञान विद्या शाखेतील विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी परीक्षा घेतली जाणार आहे. त्यात एम. एस्सी. केमिस्ट्री, मायक्रोबायोलॉजी, स्टॅटेस्टिक, बॉटनी, इन्व्हारमेंटल सायन्स, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, बायोकेमिस्ट्री, इलेक्ट्रॉनिक्स, मॅथ्यमेटिक्स, फिजिक्स, झूलॉजी, एम. ए. मास कम्युनिकेशन, एमसीए सायन्स, एम. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, अॅग्रो केमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट, नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम. टेक रुरल टेक्नॉलॉजी, बीजेसी., एमजेसी., बी. लिब., एम. ए. रशियन लँग्वेज, एम. एस. डब्ल्यू, एम. ए. जिओग्राफी, एमबीए रुरल मॅनेजमेंट, एमबीए एक्झिक्युटिव्ह डिस्टन्स मोड या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकूण १९ केंद्रावर ऑफलाईन स्वरुपामध्ये परीक्षा होणार आहे. त्यात कोल्हापूर जिल्ह्यात सहा, तर सांगली व सातारा जिल्ह्यात प्रत्येकी पाच आणि बेळगावमध्ये एक परीक्षा केंद्र राहणार आहे. दरम्यान, एम. ए., बी. कॉम., बी. ए., एलएलएम., एम. लिब., एमआरएस., बीएस्सी-एमएस्सी नॅनो सायन्स आदी दहा आणि विविध ४८ पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा होणार नाही.

> ‘पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ऑफलाईन आणि एमसीक्यू स्वरुपात प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. त्यासाठी केंद्र निश्चितीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.
>
> **-डॉ. अजितसिंह जाधव,**
> संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 APR 2024
तरुण भारत

# विद्यापीठांतर्गत २६, २७ एप्रिलच्या परीक्षा प्रशिक्षणामुळे पुढे ढकलल्या

**कोल्हापूर :** महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना लोकसभा निवडणूक प्रशिक्षणासाठी जावे लागणार आहे. त्यामुळे मार्च–एप्रिल २०२४ उन्हाळी सत्रातील २६ व २७ एप्रिल रोजी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. या दोन दिवसांचे पेपर संबंधीत अभ्यासक्रमाचा शेवटचा पेपर झाल्यावर होतील. या परीक्षांचे वेळापत्रक यथावकाश प्रसिध्द करण्यात येणार आहे, याची विद्यापीठ अधिविभाग, महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना पुढे ढकललेल्या पेपरची माहिती द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 APR 2024
पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्रातील ११५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या सुमारे ११५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहे.




विद्यापीठ परीक्षा विभागाकडून उन्हाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी मास्टर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ एज्युकेशन, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, मास्टर ऑफ आटर्स (भूगोल), मास्टर ऑफ सोशल वर्क, डिप्लोमा इन टॅक्सेशन, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन, बीएस्सी., एमएस्सी. (नॅनो सायन्स), बॅचलर ऑफ कॉमर्स आदी २१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला ५ हजार ४३४ विद्यार्थी बसले त्यापैकी ५१० विद्यार्थी अनुपस्थित होते. दरम्यान, दि. २३ रोजी एमए (तबला), एमए (इन्स्ट्रूमेंटल म्युझिक), सर्टिफिकेट कोर्स इन फ्रेंच लँग्वेज, बायोटेक्नॉलॉजी, बीए (डिफेंन्स स्टडीज) आदी १६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहे.

परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. २३ एप्रिल रोजी भरारी पथकाकडून कोल्हापूर (४), सातारा (१) असे मिळून ५ गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 APR 2024
तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत १३२ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. आत्तापर्यंत १३२ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर झाले. कमीत कमी वेळेत निकाल जाहीर करून विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाचा मार्ग रिकामा केला आहे.

बुधवारी १९ विषयांच्या परीक्षा झाल्या. या परीक्षेसाठी ४ हजार ५४ पैकी ३ हजार ४९५ विद्यार्थी उपस्थित होते. तर ५५९ विद्यार्थी अनुपस्थित होते.

भरारी पथकाकडून कोल्हापूर १९, सांगली ४ तर सातारा १ असे २४ कॉपीच्या प्रकारांची नोंद केली आहे. परीक्षा

प्रमाद समितीसमोर सुनावणी होऊन गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई केली जाणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी नियमांच्या अधीन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले.